डन्नोचे साहस

निकोलाई नोसोव्ह

14

शहरात फेरफटका

डन्नोचे साहस

निकोलाई नोसोव्ह

14

शहरात फेरफटका

रेखाचित्रे: बोरिस कलाउशिन

मराठी: अश्विनी बर्वे

स्नोड्रॉप, कॉर्नफ्लॉवर आणि डन्नो एका रस्त्यावर गेले, ज्याच्या दुतर्फा विलोच्या पातळ काड्यांची कुंपणे होती. त्या कुंपणांच्या मागे लाल आणि हिरव्या छपरांची सुंदर घरे दिसत होती. घरांच्या वर सफरचंद, नाशपाती आणि आलुबुखाराची प्रचंड झाडे डोलत होती. ही झाडे रस्त्यांवर तसेच बागांमध्येही वाढली होती. तिथे इतकी झाडे आणि झुडपे होती की त्या गावाला 'ग्रीनव्हिल' म्हटले जात असे.

डन्नोने कुतूहलाने आजूबाजूला नजर टाकली. सगळं काही अगदी स्वच्छ होतं. प्रत्येक बागेत माईटस स्त्रिया काम करताना दिसत होते.

त्यांपैकी काहीजणी गवत कापत होत्या, काहीजणी पायवाटा झाडत होते, तर काहीजणी कार्पेटच्या लांब पायपुसण्यांवरील धूळ झटकत होते. या पायपुसण्या केवळ ग्रीनव्हिलमधील घरांच्या फरशीवरच नव्हे, तर पदपथांवर आणि रस्त्यांवरही अंथरलेल्या होत्या.

काही गृहिणींना येणाऱ्या-जाणाऱ्यांमुळे आपले गालिचे खराब होतील याची इतकी भीती वाटत होती की, त्या कुंपणाजवळ उभ्या राहून लोकांना त्यावर न चालण्याची, किंवा चालल्यास आधी पाय काळजीपूर्वक पुसून घेण्याची विनंती करत असत. बऱ्याच घरांसमोरील बागांमधील पायवाटांवर पायघड्या अंथरलेल्या होत्या आणि घरांच्या बाहेरच्या बाजूला रंगीबेरंगी गालिचे टांगलेले होते.

ग्रीनव्हिलमध्ये पाणीपुरवठा बांबूच्या नळ्यांमधून होत असे. सर्वांना माहीत आहे की, बांबू पोकळ असतो आणि त्यामुळे तो नळ्या म्हणून खूप चांगला उपयोगी पडतो. तुम्हाला वाटेल त्याप्रमाणे त्या जमिनीत पुरलेल्या नव्हत्या, तर जमिनीपासून वर लाकडी खांबांवर ठेवलेल्या होत्या, जेणेकरून त्या सडणार नाहीत. माइट्स गळतीवर लक्ष ठेवत आणि त्यांची काळजीपूर्वक देखभाल करत, त्यामुळे त्या नळ्या खूप काळ टिकल्या. मुख्य पाण्याच्या नळीची एक भाग प्रत्येक घरात जात असे. याशिवाय, प्रत्येक घरासमोर एक कारंजे होते. हे फायदेशीर तसेच सुंदरही होते, कारण कारंज्याच्या काठावरून वाहणारे पाणी बागांना पाणी देण्यासाठी वापरले जात असे. प्रत्येक घरात एक भाजीची बाग होती, ज्यात बीट, गाजर, सलगम, मुळा आणि इतर भाज्या पिकत असत.

डन्नोने एका बागेत काही मुलींना भाज्या गोळा करताना पाहिले. आधी त्या सलगम किंवा गाजराभोवतीची माती खणून काढत, मग त्याच्या वरच्या टोकाला दोरी बांधून पूर्ण ताकदीने ओढत असत. जेव्हा सलगम किंवा गाजर मुळासकट बाहेर येत, तेव्हा त्या मुली खूप ओरडत आणि हसत त्याला ओढत घरी घेऊन जात.

"तुमच्या गावात मला फक्त मुलीच का दिसतात? इथे एकही मुलगा नाही का?" डन्नोने विचारले.

"नाही, इथे नाहीत. सगळे मुलगे नदीकिनारी राहायला गेले आहेत. त्यांनी 'काइट टाऊन' नावाचं स्वतःचं गाव वसवलं आहे."

"त्यांनी असं का केलं?" डन्नोने विचारले.

"त्यांना तिथे जास्त आवडतं. उन्हाळ्यात ते दिवसभर उन्हात लोळत आणि पोहत असतात, तर हिवाळ्यात बर्फावर स्केटिंग करतात. वसंत ऋतूत जेव्हा नदीला पूर येतो आणि त्यांच्या शहरात पाणी भरतं, तेव्हा त्यांना खूप मजा येते."

"त्यांना त्यात काय मजा दिसते?" असे आश्चर्यचकित झालेल्या डन्नोने विचारले.

"मला माहीत नाही," स्नोड्रॉप म्हणाली, "पण आमच्या माइट मुलांना ते आवडतं. ते बोटींमधून फिरून एकमेकांना वाचवतात. त्यांना साहसे खूप

"मला पण," डन्नो म्हणाला. "मी तुमच्या त्या लहान मुलांची ओळख करून घेऊ शकेन का?"

"नाही, तू जाऊ शकणार नाहीस," स्नोड्रॉप म्हणाली. "एक तर, काइट टाऊनला पोहोचायला पूर्ण एक तास लागतो; दुसरं म्हणजे, आमची मुलं तुझ्या डोक्यात वाईट विचार घालतील; आणि तिसरं म्हणजे, आमचं त्यांच्याशी बोलणं-चालणं नाही."

"ते का?"

"त्याला एक चांगलं कारण आहे," कॉर्नफ्लॉवर म्हणाली. "गेल्या हिवाळ्यात त्यांनी आम्हाला नवीन वर्षाच्या पार्टीला बोलावलं होतं, तिथे संगीत आणि नाच असेल असं सांगून. आणि जेव्हा आम्ही तिथे पोहोचलो, तेव्हा तुला माहीत आहे त्यांनी काय केलं? आमच्यावर बर्फाचे गोळे फेकले!"

"त्यात काय एवढं?" डन्नो म्हणाला.

"त्यात काय? आम्ही तेव्हापासून त्यांच्याशी बोललो नाही. आमच्यापैकी कोणीही त्यांना कधी भेटायला जात नाही."

"आणि ते तुम्हाला भेटायला येत नाहीत का?"

"नाही, ते तसे करत नाहीत. सुरुवातीला त्यांच्यापैकी काहींनी तसा प्रयत्न केला, पण खात्री बाळग, त्यांच्यासोबत खेळायला एकही मुलगी तयार नव्हती. आम्ही त्यांना इतकं पूर्णपणे दुर्लक्षित केलं की त्यांनी खोड्या करायला सुरुवात केली — खिडक्या फोडल्या आणि कुंपण तोडले," स्नोड्रॉप म्हणाली.

"मग त्यांनी नेल्स नावाच्या एका बदमाश माणसाला आमच्या गावात पाठवलं," कॉर्नफ्लॉवर म्हणाली. "काय म्हणावं याला!"

"काय गंमत आहे ना!" स्नोड्रॉप म्हणाली. "तो आला आणि म्हणाला की त्याला आपल्याशी मैत्री करायची आहे, कारण त्यालाही मुलं आवडत नव्हती, ती खूप खोडकर होती. आम्ही त्याला आमच्या गावात राहायला परवानगी दिली, आणि तुला काय वाटतं त्याने काय केलं असेल? रात्री खिडकीतून बाहेर चढून एका घराच्या दाराला एक खांब टेकवला, जेणेकरून सकाळी कोणी बाहेर येऊ शकणार नाही, दुसऱ्या घराच्या दारावर एक लाकडी ठोकळा टांगला, जेणेकरून जो कोणी दार उघडेल त्याच्या डोक्याला फटका बसेल, तिसऱ्या घराच्या पायरीवर एक दोरी बांधली, जेणेकरून जो कोणी बाहेर येईल तो अडखळून खाली पडेल, चौथ्या घराची चिमणी पाडली, पाचव्या घराच्या खिडक्या फोडल्या...."

हे सगळं ऐकून डन्नोला हसू आवरता आले नाही.

"तुला हे गंमतीशीर वाटतं," कॉर्नफ्लॉवर म्हणाली, "पण किती मुलींच्या नाकावर गाठी आल्या होत्या ते तू बघायला हवं होतंस! एक मुलगी तिची चिमणी दुरुस्त करायला छतावर चढली असता खाली पडली आणि तिचा पाय जवळजवळ मोडलाच होता."

"मी मुलींवर हसत नाहीये," डन्नो म्हणाला. "मी त्या नेल्स नावाच्या माणसावर हसतोय."



“तू त्याचे वागणे हसण्यावरी नेऊ नको. तू त्याला शिक्षा केली पाहिजे, जेणेकरून त्याला पुन्हा अशी वाईट कृत्ये करण्याची इच्छा होणार नाही," स्नोड्रॉप म्हणाली.

त्या क्षणी ते रस्त्याच्या मधोमध वाढलेल्या एका सफरचंदाच्या झाडाजवळून जात होते. त्याच्या सर्व फांद्या पिकलेल्या लाल सफरचंदांनी लगडलेल्या होत्या. त्याला एक लाकडी शिडी टेकवून ठेवली होती, पण ती फक्त खोडाच्या अर्ध्या उंचीपर्यंतच पोहोचत होती. वरच्या फांद्यांवरून दोरीच्या शिड्या लटकत होत्या. दोन मुली झाडावर चढल्या होत्या. त्यांच्यापैकी एक सफरचंदाचे देठ कापत होती, तर दुसरी तिला खाली पडू नये म्हणून धरून होती.

"काळजी घे," कॉर्नफ्लॉवरने डन्नोला बजावले. "एखादे सफरचंद तुझ्या डोक्यावर पडून तुझा जीव जाऊ शकतो."

“शक्य नाही!" डन्नो गर्वाने म्हणाला. "माझं डोकं जाड आहे!"

"मुलांना वाटतं की ते खूप शूर आहेत, पण आम्हीही त्यांच्याइतकेच शूर आहोत," स्नोड्रॉप म्हणाली. "बघा त्या दोन मुली किती उंच चढल्या आहेत."

"पण मुली फुग्यांमध्ये बसून वर जात नाहीत आणि मोटारगाड्यांमधून फिरत नाहीत," डन्नो म्हणाला.

"अरे, जात नाहीत का?" स्नोड्रॉप म्हणाली, "आमच्या बऱ्याच मुलींना गाडी चालवता येते."

“का, तुमच्याकडे गाडी आहे का?”

“हो, आहे. पण ती आता बंद पडली आहे. ती कशी दुरुस्त करायची हे आम्हाला माहीत नाही. कदाचित तू आम्हाला मदत करू शकशील?”

"नक्कीच करेन," डन्नो म्हणाला. "मला गाड्यांबद्दल बरंच काही माहिती आहे. बेंडम आणि ट्विस्टम हॉस्पिटलमधून बाहेर आल्याबरोबर मी त्यांच्याकडून ती तुमच्यासाठी दुरुस्त करून घेईन."

"अरे, धन्यवाद!" स्नोड्रॉपने टाळ्या वाजवत म्हटले.

त्याच क्षणी डन्नोची नजर एका अशा अद्भुत दृश्यावर पडली जे त्याने यापूर्वी कधीही पाहिले नव्हते. रस्त्याच्या मधोमध दोन-किंवा अगदी तीन मजली घराएवढे मोठे हिरवे चेंडू पडलेले होते.

"ते सुद्धा फुगे आहेत का?" त्याने विचारले.

स्नोड्रॉप आणि कॉर्नफ्लॉवर हसले.

"ती टरबूज आहेत," त्या म्हणाल्या. “तू याआधी कधी टरबूज पाहिलं नाही का?"

"कधीच नाही," डन्नोने कबूल केले. "मी जिथे राहतो तिथे टरबूज पिकत नाहीत. ते कशासाठी असतात?"

"ज्या मुलाला टरबूज कशासाठी असतं हेच माहीत नाही!" स्नोड्रॉप हसली. "एका मिनिटात तू मला सफरचंद आणि नाशपाती कशासाठी असतात असं विचारायला लागशील."

"तुम्हाला असं म्हणायचं आहे का की तुम्ही ते खाता?" आश्चर्यचकित झालेल्या डन्नोने विचारले. "एवढ्या आकाराची कोणतीही गोष्ट खायला एक वर्ष लागेल."

"आम्ही ते खात नाही," कॉर्नफ्लॉवर म्हणाली. "आम्ही त्यातला रस काढून घेतो. तो पाकासारखा असतो. जर तुम्ही टरबुजाच्या तळाला छिद्र केले, तर एकाच टरबुजापासून अनेक पिंपे पाक मिळू शकतो."

"त्यांना लावण्याचा विचार तरी कोणाच्या डोक्यात आला असेल?" डन्नो म्हणाला.

"थिसल नावाची एक खूप हुशार लहान मुलगी आहे," कॉर्नफ्लॉवर म्हणाली. "तिला फळे आणि भाज्या पिकवायला आणि त्यांचे नवनवीन प्रकार मिळवायला खूप आवडते. आमच्याकडे पूर्वी कधीच टरबूज नसायचे, पण एके दिवशी कोणीतरी सांगितले की तिने जंगलात रानटी टरबूज उगवलेले पाहिले आहेत. त्या शरद ऋतूत थिसलने एका मोहिमेचे नेतृत्व केले, ज्यांनी रानटी टरबूज सापडेपर्यंत जंगलात शोध घेतला. ती बिया घेऊन परत आली आणि पुढच्या वसंत ऋतूत थिसलने त्या लावल्या."

या बियांपासून आलेली कलिंगडे खूप मोठी होती, पण त्यांचा रस आंबट होता. थिसलने रात्रंदिवस सर्व कलिंगडे चाखून पाहिली, जोपर्यंत तिला कमी आंबट रस असलेले एक कलिंगड सापडले नाही. पुढच्या वर्षी तिने त्या कलिंगडाच्या बिया लावल्या. नवीन फळाचा रस अधिक गोड होता. पुन्हा थिसलने सर्वांत गोड कलिंगड निवडले आणि पुढच्या वर्षी त्याच्या बिया लावल्या. जोपर्यंत तिला मधासारखी गोड कलिंगडे मिळाली नाहीत, तोपर्यंत ती वर्षानुवर्षे हेच करत राहिली.”

“मग ते तिच्यावर का रागावले?" डन्नोने विचारले.

”त्या कलिंगडांपासून काही चांगलं होईल असं कुणालाही वाटत नव्हतं. आणि शिवाय, अख्खं गाव त्या कलिंगडांनी भरलेलं होतं — कलिंगडांमुळे रस्त्यावरून चालायलाही जागा नव्हती. अनेकदा ती घरांच्या शेजारी उगवत असत. जोपर्यंत ती लहान होती, तोपर्यंत काही फरक पडत नव्हता, पण जेव्हा ती मोठी झाली, तेव्हा त्यांच्यामुळे भिंती कोसळण्याची भीती वाटू लागली. एका कलिंगडामुळे एक घर खरंच कोसळलं होतं. आमच्या काही मुलींना कलिंगड लावण्यावर बंदी घालायची होती, पण इतरांनी थिसलची बाजू घेतली आणि तिला तिच्या कामात मदत केली.”

तोपर्यंत ते नदीच्या काठावर आले होते.

"याला टरबूज नदी म्हणतात," स्नोड्रॉप म्हणाली. "बघ, काठाशी किती टरबूज उगवले आहेत."

कार्पेटच्या पट्टीसारखा दिसणारा एक अरुंद पूल नदीच्या एका काठावरून दुसऱ्या काठावर टाकण्यात आला होता. तो खूप जाड आणि मजबूत कापडाचा बनलेला होता.

"आम्ही तो बांधला," कॉर्नफ्लॉवर म्हणाली. "ते कापड विणायला आम्हाला एक महिना लागला, मग मुलांनी तो नदीवर ताणून लावायला मदत केली."

"खूप मजा आली!" स्नोड्रॉप म्हणाली. "त्यांच्यापैकी एक जण पाण्यात पडला आणि जवळजवळ बुडणारच होता, पण कोणीतरी त्याला बाहेर काढले."

कॉर्नफ्लॉवर धैर्याने पुलावर चढून पलीकडे गेली. डन्नोसुद्धा तितक्याच धैर्याने पुढे गेला, पण पूल डोलत असल्याचे जाणवताच तो थांबला.

"तू का थांबला आहेस?" स्नोड्रॉपने विचारले. "तू घाबरली आहेस का?"

“नक्कीच नाही. मी फक्त विचार करत होतो की हा पूल किती मजेशीर आहे.”

तो खाली वाकला आणि कडेला धरून राहिला, आणि त्याला भीती वाटत नाही हे दाखवण्यासाठी हसत होता.

स्नोड्रॉपने त्याचा एक हात धरला, तर कॉर्नफ्लॉवरने दुसरा, आणि त्या दोघींनी मिळून त्याला पुलावरून पलीकडे नेले. तो घाबरला आहे हे त्या दोघींनाही दिसत होते, पण त्या त्याच्यावर हसल्या नाहीत, कारण त्यांना माहीत होते की माइट्स मुलांना स्वतःवर हसलेले सहन होत नाही.

पलीकडे पोहोचल्यावर, ते रस्त्याने पुढे गेले आणि पुढे गेल्यावर त्यांना हिरव्या छताचे एक पांढरे घर दिसले.

"हे आमचं रुग्णालय आहे," कॉर्नफ्लॉवर म्हणाला.

Н. Носов

ПУТЕШЕСТВИЕ ПО ГОРОДУ

На языке бенгали

Nikolai Nosov

A WALK ABOUT TOWN

In Bengali

শিশুদের জন্য

30 к.